सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २१९ • शुक्रवार दि.२९ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## जरांगेंच्या भेटीसाठी विखे,लाड सरसावले
### उपोषणापूर्वीच मागण्यांवर तोडग्याचे संकेत?

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी-मराठा आरक्षणासाठी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप नेते प्रसाद लाड यांचा समावेश असलेले शिष्टमंडळ आज मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार असल्याने आंदोलनापूर्वीच तोडग्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी उद्यापासून आंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला असतानाच राज्य सरकारच्या हालचालींना वेग आला आहे. राधाकृष्ण विखे पाटील हे छत्रपती संभाजीनगर येथे दाखल पान ४ वर

## पुण्यात विषारी दारुने १३ जणांचा मृत्यू;स्थानिक संतप्त
### आ.रोहित पवार आक्रमक,दारु अड्ड्याची तोडफोड

पुणे:पुण्यातील पिंपरी-चिंचवड आणि हडपसर परिसरात विषारी हातभट्टी दारू प्राशनामुळे १३ जणांचा मृत्यू झाल्याच्या धक्कादायक घटनेनंतर स्थानिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आक्रमक भूमिका घेत दारू विक्री करणाऱ्या अड्ड्याची तोडफोड केली.




पिंपरी-चिंचवडमधील ८ आणि हडपसर परिसरातील ५ अशा एकूण १३ जणांचा विषारी हातभट्टी दारूमुळे मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोषींवर कठोर कलमे लावून तातडीने कारवाई करण्याचे आदेश पुणे पोलिसांना दिले आहेत.दरम्यान, रोहित पवार यांनी हडपसर परिसरात जाऊन मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी कार्यकर्त्यांसह संबंधित दारू अड्ड्याकडे मोर्चा वळवला. संतप्त झालेल्या पवार यांनी स्वतः अड्ड्यावरील काऊंटर फोडला, तर कार्यकर्त्यांनी पत्रे उखडून संपूर्ण अड्ड्याची तोडफोड केली.यावेळी बोलताना रोहित पवार यांनी राज्य सरकार आणि प्रशासनावर जोरदार टीका केली. दारू पिऊन गरीबांची माणसे मरत आहेत, मात्र प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही. जेव्हा यंत्रणा अपयशी ठरते, तेव्हा लोकांना कायदा हातात घ्यावा लागतो, असे ते म्हणाले.तसेच, धर्म पाहून बुलडोझर चालवले जातात, मात्र अशा बेकायदेशीर दारू अड्ड्यांवर कारवाई का होत नाही? असा पान ४ वर

## नांदेडात'सीबीआय'च्या पथकाकडून विद्यार्थी व पालकांची चौकशी

नांदेड/प्रतिनिधी-नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयच्या पथकाने गुरुवारी नांदेड शहरातील काही विद्यार्थी व त्यांच्या पालकांची सात ते आठ तास चौकशी केल्याने एकच खळबळ उडाली आहे. त्यामुळे नीट पेपरफुटीचे धागेदोरे नांदेडपर्यंत पोहचल्याचा संशय व्यक्त केला जात असून त्यामुळे संबंधीतांची धाकधुक वाढली आहे.

सीबीआयच्या सात ते आठ अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक तीन वाहनांद्वारे गुरुवारी सकाळी नांदेड शहरात दाखल झाले. भाग्यनगर व शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील तीन ठिकाणी सीबीआयच्या पथकाने दोन विद्यार्थीनींची व एका कुटुंबाची सात ते आठ तास चौकशी करून झाडाझडती घेतली. नीट पेपर परीक्षेच्या काही दिवस अगोदरच या विद्यार्थीनीना प्रश्नपत्रिकेतील काही प्रश्न मिळाल्याचा संशय आहे. तसेच प्रश्नपत्रिका विकत घेतल्याचाही संशय सीबीआयला असून त्यांनी विद्यार्थीनीच्या एका कुटुंबाची कसून चौकशी केली. तसेच शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत वास्तव्यास असलेल्या एका जणाची सीबीआयच्या पथकाने यापूर्वीच चौकशी केली होती. संबंधीत संशयीत इसमाची सीबीआयच्या पथकाने दुसऱ्यांदा चौकशी करून त्याच्यावर प्रश्नांचा भडीमार केला आहे. सीबीआयचे पथक दुसऱ्यांदा नांदेड शहरात आले होते. नीट पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर सीबीआयच्या पथकाने विद्युतनगर भागातील कदम कुटुंबियांची चौकशी केली होती. पेपरफुटीचे लातूर नंतर नांदेड कनेक्शन उघडकीस येण्याची शक्यता असून सीबीआयचे अधिकारी कसून चौकशी करीत आहेत. गुरुवारी तीन ठिकाणी सात ते आठ तास संबंधीतांची चौकशी करुन सीबीआयचे पथक हे लातूरकडे रवाना झाले.

## नांदेड आणि नाशिक वगळता जागा वाटप निश्चित-सपकाळ

मुंबई/प्रतिनिधी-महाविकास आघाडीने जागावाटपाचा प्राथमिक फॉर्म्युला निश्चित केला आहे. काँग्रेस ८, उद्धव ठाकरे



यांच्या शिवसेना (ठाकरे गट) ४ आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ३ जागांवर निवडणूक लढवणार असल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. मात्र, नांदेड आणि नाशिक या दोन जागांबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसून तीनही पक्षांनी दावा केल्याने चर्चा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महाविकास आघाडीच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, १७ पैकी १५ जागांबाबत एकमत झाले आहे. नांदेड आणि नाशिक या महत्त्वाच्या जागांवर कोणता पक्ष उमेदवार देणार, याबाबत पुढील दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल.जागावाटपानुसार काँग्रेस चंद्रपूर, पान ४ वर

## इंधन दरवाढी विरोधात काँग्रेसचे आंदोलन
### रस्त्यावर चूल मांडली,बैलगाडीवर स्कुटी ठेवून केंद्र सरकारचा निषेध

नांदेड/प्रतिनिधी-केंद्र सरकारच्या इंधन दरवाढीच्या धोरणाविरोधात तसेच इंधन टंचाईच्या निषेधार्थ नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आयटीआय परिसरातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात कार्यकर्त्यांनी रस्त्यावर चूल मांडून तसेच बैलगाडीवर स्कुटी ठेवून केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात अनोख्या पद्धतीने निषेध नोंदविला.

या आंदोलनात केंद्र सरकारच्या वाढत्या इंधन दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांवर पडणारा आर्थिक बोजा आणि इंधन टंचाईमुळे निर्माण झालेल्या अडचणी याकडे लक्ष वेधण्यात आले. यावेळी आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत इंधन दरवाढ तातडीने मागे घेण्याची मागणी केली. पेट्रोल पंपावर तासन्तास शेतकरी डिझेलसाठी उभे राहत आहेत. परंतु त्यांना डिझेल उपलब्ध करुन दिले जात नाही. पेट्रोल व डिझेलच्या टंचाईमुळे कामे खोळंबली जात असून त्याचा परिणाम शेतातील कामांवर पडत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या धोरणाच्या निषेधार्थ काँग्रेस पक्षाच्यावतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात माजी आ. ईश्वरराव भोसीकर, ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, शहराध्यक्ष अब्दुल गफार, ॲड.सुरेंद्र घोडजकर, नगरसेवक मुन्ना अब्बास हुसेन, डॉ. रेखा चव्हाण, पप्पू कौंढेकर, श्रीनिवास मोरे, नगरसेवक




सत्यपाल सावंत, एकनाथ मोरे, आनंद कल्याणकर, चांदोजी सूर्यवंशी, शिवाजी पाचपिंपळीकर, रमेश चित्ते, ज्ञानेश्वर राजेगोरे, सुरेश हटकर, अतुल पेद्देवाड, पान ४ वर

## राज्यात यंदा कमी पावसाचा अंदाज
### जूनमध्ये उष्णतेच्या लाटांची शक्यता

मुंबई/प्रतिनिधी-यंदाच्या मान्सून हंगामावर एल निनोचे सावट असल्याने महाराष्ट्रासह देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हवामान खात्याने नुकत्याच जाहीर केलेल्या सुधारित अंदाजानुसार देशात यंदा सरासरीच्या केवळ ९० टक्के पर्जन्यमानाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यापूर्वी एप्रिलमध्ये हा अंदाज ९२ टक्के होता.

महाराष्ट्रातील पर्जन्यस्थिती बाबत चिंता व्यक्त करताना ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ के. एस. होसाळीकर यांनी सांगितले की, राज्यातील अनेक भागांत पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात पर्जन्यमानात घट होण्याचा अंदाज आहे. जून महिन्यात एल निनोचा प्रभाव तुलनेने कमी राहील, मात्र जुलै आणि ऑगस्टमध्ये त्याचा प्रभाव वाढत जाईल. सप्टेंबरमध्ये हा प्रभाव सर्वाधिक तीव्र होण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम मान्सूनवर होणार आहे.चार महिन्यांच्या मान्सून काळात पावसाचे प्रमाण घटल्यास शेती, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ऊर्जा निर्मिती आणि सार्वजनिक आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर परिणाम होऊ शकतो. याचे दुष्परिणाम पुढील वर्षभर जाणवण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, जून महिन्यात राज्यातील काही भागांमध्ये उष्णतेच्या लाटांचाही धोका असल्याचे होसाळीकर यांनी सांगितले. जून हा मान्सूनच्या संक्रमणाचा महिना मानला जातो. केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर साधारण ४० ते ४५ दिवसांत तो राजस्थानपर्यंत पोहोचतो. मात्र मान्सूनच्या प्रगतीला विलंब झाल्यास अनेक भागांमध्ये उष्णतेचा प्रभाव पान ४ वर

## विधान परिषदेसाठी सत्ताधारी महायुती आणि महाविकास आघाडीचे जागा वाटप अंतिम टप्प्यात
### नांदेडची जागा महायुतीत भाजपला तर महाविकास आघाडीत रस्सीखेच

मुंबई/प्रतिनिधी-विधान परिषदेच्या १७ रिक्त जागा आणि एक पोटनिवडणूक अशा मिळून १८ जागांसाठी होवू घातलेल्या निवडणुकीच्या जागा वाटप महायुती आणि महाआघाडीत अंतिम टप्प्यात आले आहे. महायुतीत नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची जागा भाजपला सुटली आहे तर महाविकास आघाडीत काँग्रेस आणि शिवसेनेत या जागेवरुन रस्सीखेच सुरु आहे.

विधान परिषदेच्या १७ रिक्त जागा आणि एका पोटनिवडणुकीसह एकूण १८ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या महायुती आणि विरोधकांच्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार आणि शिवसेना ठाकरे गट मिळून या निवडणुका लढवणार आहेत. महायुतीत स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळाच्या आधारे अनेक ठिकाणी भाजपचे वर्चस्व असले तरी मित्रपक्षांना प्रतिनिधित्व मिळावे यासाठी काही जागा सोडण्याची तयारी पक्षाने दर्शविली आहे. आतापर्यंत झालेल्या चर्चेनुसार भाजप १०, शिवसेना ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागांवर उमेदवार उभे करण्याची शक्यता आहे. शिवसेनेच्या वाट्याला ठाणे, यवतमाळ, नाशिक तसेच परभणी-हिंगोली या जागा जाण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला पुणे आणि रायगड- पान ४ वर

## इज्जतगाव-अंतरगाव येथे अवैध वाळू उपसा;प्रशासनाविरोधात संताप



नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यात शासनाने एकही अधिकृत वाळू घाट सुरू केलेला नसताना इज्जतगाव व अंतरगाव परिसरातील गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असल्याची बाब समोर आली आहे. रात्रीच्या वेळी बोटींच्या सहाय्याने नदीपात्रातून वाळू काढून ती हायवा व टिपरद्वारे विविध भागांत पाठवली जात असल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, दररोज रात्री उशिरापर्यंत नदीपात्रात अवैध वाळू उपसा सुरू असतो. विशेष म्हणजे अंतरगाव गावातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळू साठवून ठेवण्यात आल्याचेही दिसून येत आहे. गावातील मोकळ्या जागांवर व रस्त्यांच्या कडेला वाळूचे ढीग उघडपणे साठवण्यात आल्याने हा अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असल्याची चर्चा आहे. दहा ते पंधरा हायवा व टिपरद्वारे वाळू वाहतूक होत असून महसूल व पोलिस प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत. विशेष म्हणजे या अवैध धंद्याला आळा घालण्याची प्रमुख जबाबदारी असलेले नायगावचे तहसीलदार धमपिर्या गायकवाड तसेच कुंटूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नसल्याची तीव्र नाराजी नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. गोदावरी नदीपात्रातील अनियंत्रित वाळू उपशामुळे पर्यावरणासह नदीची नैसर्गिक रचना धोक्यात येत असल्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले व पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी तात्काळ दखल घेऊन अवैध वाळू उपसा बंद करावा व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## कृषी विभागाची धडक कारवाई;दहा कृषी निविष्ठा केंद्राचे परवाने निलंबीत
### दोन परवाने कायमस्वरुपी रद्द

नांदेड/प्रतिनिधी- नायगांव तालुक्यातील शेतकऱ्यांकडून प्राप्त तक्रारी, प्रसिद्ध झालेल्या बातम्या व तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा अधिक्षक कृषी अधकिारी यांनी नायगांव तालुक्यातील सात कृषी सेवा केंद्रांवर कठोर कारवाई करुन त्यांचे खत परवाने सहा महिन्यासाठी निलंबीत केले आहेत.

नायगाव येथील दशरथ कृषी सेवा केंद्र, केदार कृषी सेवा केंद्र, वसंत अग्रो सर्विस सेंटर, गजानन कृषी सेवा केंद्र, हनुमान कृषी सेवा केंद्र, मातोश्री ग्रो एजन्सी, शिवकृपा कृषी सेवा केंद्र, नायगांव तसेच मे.वर्षा ग्रो ट्रेडर्स, खांबाळा ता.मुदखेड, मे.व्यंकटरमणा कृषि सेवा केंद्र, कुरुळा ता.कंधार, मे.तिरुमला कृषि सेवा केंद्र, कुरुळा ता.कंधार केंद्राचे सुनावणीअंती निदर्शनास आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने परवाने निलंबीत केले आहेत. तसेच मे.शिवकृपा कृषि विकास केंद्र, माळकौठा ता.मुदखेड व व्यंकटेश कृषि भांडार नविन मोंढा, नांदेड यांच्या खत वाटपामध्ये गंभीर स्वरुपाच्या त्रुटचा आढळल्यामुळे पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल झाल्यामुळे यांचे परवाने कायमस्वरुपी रद्द केले आहेत. जिल्ह्यामध्ये कुठेही रासायनिक खतांची जादा दराने किंवा विनापरवाना विक्री होत असल्यास अथवा खते उपलब्ध असतांना विक्री करीत नसल्यास तात्काळ कृषी विभागाकडे संपर्क साधावा. तसेच शेतकऱ्यांनी परवानाधारक कृषि निविष्ठा केंद्रातूनच निविष्ठा खरेदी कराव्यात असे आवाहन कृषी विभागामार्फत जिल्हा अधिक्षक कृषी अधकिारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

# नीट परीक्षा:कोचिंग संस्कृती आणि शिक्षणव्यवस्थेतील वाढता संभ्रम




भारतातील शिक्षणव्यवस्था ही केवळ नोकरी किंवा पदवी मिळवण्याचे साधन नसून राष्ट्रनिर्मितीचा मूलाधार मानली जाते. डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, वैज्ञानिक आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञ हे समाजाचे दिशादर्शक असतात. या सर्व क्षेत्रांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी परीक्षा प्रणाली उभी करण्यात आली आहे. त्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची, बुद्धिमत्तेची, मेहनतीची आणि नैतिकतेची कसोटी मानल्या जातात. मात्र गेल्या काही वर्षांत विशेषतः वैद्यकीय शिक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट परीक्षेबाबत निर्माण झालेला संशय, कोचिंग क्लासचे वाढते जाळे, पैशांच्या जोरावर होणारी स्पर्धा आणि मानसिक तणाव यामुळे संपूर्ण शिक्षणव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

आज परिस्थिती अशी झाली आहे की, खरा गुणवंत डॉक्टर कोण? हा प्रश्न सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे. एखादा विद्यार्थी स्वतःच्या बुद्धिमत्तेने, कष्टाने आणि सातत्यपूर्ण अभ्यासाने डॉक्टर बनला आहे की पैशांच्या बळावर, कोचिंगच्या दबावाखाली किंवा भ्रष्ट व्यवस्थेच्या आधाराने पुढे गेला आहे, हे ओळखणे कठीण होत चालले आहे. हा केवळ एका परीक्षेचा प्रश्न नाही; तर देशाच्या भविष्यासंबंधी गंभीर चिंतेचा विषय आहे.आज शिक्षणाचा अर्थ ज्ञान असा उरलेला नाही; तर गुण आणि रँक इतकाच मर्यादित होत चालला आहे. अनेक विद्यार्थी अत्यंत प्रामाणिकपणे अभ्यास करतात, दिवस-रात्र मेहनत घेतात, आर्थिक अडचणींना तोंड देतात; परंतु त्यांच्यापेक्षा जास्त पैसे खर्च करणारे, महागड्या कोचिंग क्लासमध्ये जाणारे विद्यार्थी पुढे जात असल्याचे चित्र दिसते. त्यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये अन्यायाची भावना निर्माण होते.

कोचिंग उद्योग इतका मोठा झाला आहे की, काही ठिकाणी शाळा आणि महाविद्यालये दुय्यम ठरू लागली आहेत. विद्यार्थी शिक्षणासाठी नव्हे, तर परीक्षा पास होण्यासाठी शिकू लागले आहेत. लाखो रुपयांची फी घेणाऱ्या कोचिंग संस्था यशाची हमी देतात. काही ठिकाणी तर पालक घर-जमीन विकून मुलांना कोचिंगसाठी पाठवतात. ही परिस्थिती शिक्षणाला सेवा न मानता व्यवसाय बनवत आहे.डॉक्टर होणे म्हणजे केवळ परीक्षा पास होणे नाही. त्यासाठी संवेदनशीलता, रुग्णांविषयी करुणा, निर्णयक्षमता आणि नैतिकता आवश्यक असते. जर एखादा विद्यार्थी केवळ प्रश्नसंच पाठ करून, कोचिंगच्या तंत्रावर आधारित तयारी करून डॉक्टर झाला, तर तो प्रत्यक्ष रुग्णसेवेत कितपत सक्षम ठरेल, हा गंभीर प्रश्न आहे.रुग्णालयात येणारा प्रत्येक रुग्ण डॉक्टरकडे विश्वासाने पाहतो. डॉक्टरचे एक चुकीचे निदान एखाद्याचा जीव घेऊ शकते. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणामध्ये गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य असणे आवश्यक आहे. जर प्रवेश प्रक्रियेवरच संशय निर्माण झाला, तर पुढे तयार होणाऱ्या डॉक्टरांच्या गुणवत्तेबद्दलही शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे.

नीट परीक्षा देशातील सर्वात कठीण आणि स्पर्धात्मक परीक्षांपैकी एक मानली जाते. लाखो विद्यार्थी काही हजार जागांसाठी स्पर्धा करतात. या स्पर्धेत विद्यार्थ्यांवर प्रचंड मानसिक तणाव निर्माण होतो. अनेक पालक आपल्या अपेक्षा मुलांवर लादतात. डॉक्टरच व्हायचे हा हट्ट विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक क्षमतांकडे दुर्लक्ष करतो.आज अनेक विद्यार्थी अपयश सहन करू शकत नाहीत. परीक्षेतील कमी गुण, अपेक्षित रँक न मिळणे किंवा पालकांची नाराजी यामुळे काही विद्यार्थी नैराश्यात जातात. आत्महत्यांसारख्या दुर्दैवी घटना वाढत आहेत. प्रत्येक वर्षी परीक्षा काळात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या बातम्या समोर येतात. ही बाब अत्यंत वेदनादायक आहे.विद्यार्थ्यांचे आयुष्य एका परीक्षेपेक्षा खूप मोठे आहे, हे समाजाने समजून घेतले पाहिजे. अपयश म्हणजे जीवन संपले असा अर्थ नाही. मात्र आजची व्यवस्था विद्यार्थ्यांना यशस्वी आणि अयशस्वी अशा दोन गटांत विभागते. त्यामुळे आत्मविश्वास कमी होतो आणि मानसिक संतुलन बिघडते.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

पूर्वी शिक्षक हे ज्ञानदान करणारे मार्गदर्शक मानले जात होते. आज काही ठिकाणी शिक्षण क्षेत्रात व्यापारीकरण इतके वाढले आहे की, शिक्षण हे सेवा न राहता मार्केट बनले आहे. मोठमोठ्या जाहिराती, निकालांचे प्रदर्शन, टॉपर विद्यार्थ्यांचे फोटो आणि कोट्यवधींचा व्यवसाय यामुळे शिक्षणाचे पावित्र्य कमी होत आहे.काही कोचिंग संस्था विद्यार्थ्यांमध्ये कृत्रिम स्पर्धा निर्माण करतात. तू मागे पडलास, तुला यश मिळाले नाही तर आयुष्य संपले अशा मानसिकतेतून विद्यार्थ्यांना सतत भीतीत ठेवले जाते. शिक्षण म्हणजे जिज्ञासा वाढवणे, विचारशक्ती विकसित करणे आणि माणूस घडवणे हे मूलभूत उद्दिष्ट मागे पडले आहे.आज समाजात अशी धारणा वाढताना दिसते की, पैसा असेल तर कोणतीही परीक्षा पास होता येते. काही गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर लोकांचा परीक्षांवरील विश्वास कमी होऊ लागला आहे. जर विद्यार्थ्यांना असे वाटू लागले की मेहनतीपेक्षा पैशाला अधिक महत्त्व आहे, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनोबल खचेल.

ही परिस्थिती अत्यंत धोकादायक आहे. कारण देशाची प्रगती ही गुणवत्तेवर आधारित असते. भ्रष्टाचार, फसवणूक आणि पैशांच्या आधारे मिळवलेली पदवी समाजासाठी घातक ठरू शकते. जर अशा लोकांच्या हाती वैद्यकीय, न्यायव्यवस्था, प्रशासन किंवा शिक्षण क्षेत्र गेले, तर सामान्य नागरिकांचे जीवन संकटात येईल.आजच्या तरुणांपुढे अनेक आकर्षणे आहेत. सोशल मीडियावर प्रसिद्धी, त्वरित यश, पैसा आणि स्पर्धा यामुळे तरुणांचे लक्ष अभ्यास आणि व्यक्तिमत्त्व विकासापासून दूर जात आहे. काही राजकीय पक्ष, संघटना किंवा स्वार्थी गट तरुणांचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी करतात. आमचाच पक्ष योग्य, आमचेच विचार श्रेष्ठ अशी अंधभक्ती वाढवली जाते.यामुळे स्वतंत्र विचार करण्याची क्षमता कमी होते. बौद्धिक दृष्ट्या सक्षम तरुण घडण्याऐवजी भावनिक आणि दिशाहीन तरुण तयार होण्याचा धोका वाढतो. राष्ट्राला विचारवंत, संशोधक, वैज्ञानिक आणि समाजाभिमुख नागरिकांची गरज आहे; केवळ घोषणाबाजी करणाऱ्या लोकांची नाही.

समाजात अजूनही अनेक अंधश्रद्धा टिकून आहेत. काही लोक अभ्यासाऐवजी चमत्कारांवर विश्वास ठेवतात. पाणी शिंपडल्याने परीक्षा पास होईल, एखाद्या ठिकाणी नवस केल्याने डॉक्टर होता येईल किंवा केवळ धार्मिक विधींमुळे रोग बरा होईल, अशा समजुती वैज्ञानिक दृष्टिकोनाला बाधा आणतात. धर्म आणि श्रद्धा वैयक्तिक असू शकतात; परंतु शिक्षण आणि आरोग्य यामध्ये विज्ञानाला प्राधान्य असले पाहिजे. जर विज्ञानाऐवजी अंधश्रद्धेला महत्त्व दिले, तर समाज मागे जाईल. डॉक्टर, शिक्षक आणि पालक यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे.भारताचे स्वातंत्र्य लाखो लोकांच्या बलिदानातून मिळाले आहे. स्वातंत्र्यसैनिकांनी शिक्षित, प्रगत आणि समतावादी भारताचे स्वप्न पाहिले होते. त्यांनी जात, धर्म, भाषा आणि प्रांत यापलीकडे जाऊन देशासाठी संघर्ष केला. आज आपण त्या त्यागाचे स्मरण करण्याऐवजी स्वार्थ, भ्रष्टाचार आणि दिखाऊपणामध्ये अडकत चाललो आहोत.आज गरज आहे ती राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याची. शिक्षणव्यवस्था मजबूत करणे, प्रामाणिक विद्यार्थ्यांना संधी देणे आणि गुणवत्तेला न्याय मिळवून देणे हीच खरी देशसेवा ठरेल.अनेक वेळा पालक नकळत मुलांवर प्रचंड दबाव टाकतात. प्रत्येक मुलाची क्षमता वेगळी असते. सर्वच विद्यार्थी डॉक्टर किंवा अभियंता होऊ शकत नाहीत आणि तसे होणे आवश्यकही नाही. कला, क्रीडा, शेती, संशोधन, उद्योजकता, सामाजिक कार्य अशा अनेक क्षेत्रांतही यश मिळू शकते.

पालकांनी मुलांची तुलना इतरांशी करू नये. मुलांना समजून घेणे, त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे आणि अपयश स्वीकारण्याची ताकद देणे अत्यंत महत्त्वाचे आहे.शिक्षणव्यवस्थेतील गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. परीक्षा प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असली पाहिजे. कोचिंग उद्योगावर नियंत्रण, फी नियमन, विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन केंद्रे आणि मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.तसेच ग्रामीण आणि गरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे. शहरांमध्येच नव्हे, तर खेड्यापाड्यांमध्येही चांगल्या शाळा, प्रयोगशाळा आणि शिक्षक उपलब्ध झाले तर विद्यार्थ्यांना महागड्या कोचिंगवर अवलंबून राहावे लागणार नाही.विद्यार्थ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, आयुष्य कोणत्याही एका परीक्षेपेक्षा मोठे आहे. मेहनत, प्रामाणिकपणा आणि सातत्य यांना पर्याय नाही. अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा उभे राहणे आवश्यक आहे.मोबाईल, सोशल मीडिया आणि इतर व्यसनांपासून दूर राहून स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. स्पर्धा असली तरी स्वतःची मानसिक शांती टिकवणे महत्त्वाचे आहे. स्वतःचे आयुष्य संपवणे हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही.

नीट परीक्षा आणि शिक्षणव्यवस्थेभोवती निर्माण झालेला प्रश्न हा केवळ विद्यार्थ्यांचा नाही; तर संपूर्ण समाजाच्या भविष्यासंबंधी आहे. जर शिक्षणामध्ये प्रामाणिकपणा, गुणवत्ता आणि नैतिकता टिकली नाही, तर देशाच्या प्रगतीला मोठा धोका निर्माण होईल. आज आवश्यक आहे ती आत्मपरीक्षणाची. शिक्षकांनी शिक्षक म्हणून, पालकांनी पालक म्हणून, प्रशासनाने प्रशासन म्हणून आणि विद्यार्थ्यांनी विद्यार्थी म्हणून स्वतःची जबाबदारी ओळखली पाहिजे. शिक्षण ही स्पर्धेची शर्यत नसून समाज घडवण्याची प्रक्रिया आहे, हे समजणे अत्यंत आवश्यक आहे.तरुण पिढी ही देशाची शक्ती आहे. त्या शक्तीला योग्य दिशा देणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. पैसा, दिखाऊपणा आणि अंधश्रद्धा यांच्या मागे न लागता ज्ञान, विज्ञान, प्रामाणिकपणा आणि मानवी मूल्ये यांना महत्त्व दिले, तरच भारत खऱ्या अर्थाने प्रगत आणि सशक्त राष्ट्र बनेल.

# धर्म व अंधश्रद्धेच्या बाबतीत काही गोष्टी लक्षात घ्याव्यात




धर्म व अंधश्रद्धा या दोन गोष्टी. एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.धर्म हा संस्कारावर अवलंबून असतो. तशीच अंधश्रद्धाही संस्कारावर अवलंबून असते. संस्कार हे लहाणपणीच होत असतात. ते संस्कार कधी आई-वडिलांमार्फत तर कधी शेजाऱ्यांमार्फत तर कधी मित्र मैत्रिणीमार्फत तर कधी संस्कारी पुस्तकांचं वाचन करुन, व्हिडिओ पाहून होत असतात.संस्कार हे टिकून राहतात लहानपणी झालेले. कारण संस्कार म्हणजे हा एक विचार असतो, मनात प्रतिबिंबित झालेला. तो विचार एकदा का मनात बसला तर बदलता येत नाही. बदलविताही येत नाही, जर संस्कारात दृढतेची शक्ती असेल तर...तसं पाहिल्यास संस्कार हे माणसाच्या मनावर अवलंबून असतात. जे मन चंचल असतं व ते सतत बदलत असतं.

विचार...माणसाच्या मनात हरघडीला वेगवेगळे विचार येत असतात. म्हटलं जातं की माणसाच्या मनात प्रत्येक क्षणाला सात प्रकारचे विचार येत असतात. म्हणजेच एकाचवेळेस माणूस वेगवेगळी सात प्रकारची कामे करीत असतो. माणूस जीवन जगत असतांना सात प्रकारांनी जगत असतो. जर मन चंचल असेल तर तर त्याचे विचारही चंचल बनतात आणि माणसाचं मन स्थिर असेल तर माणसाचे विचारही स्थिर असतात. ज्यातून अवाईट रुढी, परंपरा, धर्म, रिती, चालीरिती आणि अंधश्रद्धाही स्थिर होवून जातात. जर मन स्थिर असेल तर त्याच्या मनातील दृढ झालेली एखादी गोष्टही वाईट जरी असली तरी त्या वस्तूस्थितीला माणूस बदलू शकत नाही. जसे पाषाणात देव आहे. ही अंधश्रद्धा जरी असली आणि ती अंधश्रद्धा जरी वाटत असली तरी ती मन स्थिर असल्यानं बदलता येत नाही. अशा अनेक अंधश्रद्धा आहेत की ज्या माणसाला अंधश्रद्धा आहेत, हे माहीत होवूनही त्या बदलल्या जात नाहीत. त्या माणसाच्या मनात वाढतच जात असतात. असाच धर्मही आहे. धर्म देखील असाच माणसाच्या मनात एकदा शिरला की तो सहजासहजी बदलता येत नाही. अन् त्याबाबतीत कोणी परीवर्तनवादी विचार जरी सांगीतला तरी तो आटल्याला सहजासहजी स्विकारता येत नाही. कारण त्याबाबतीत आपल्या मेंदूत एक वेगळंच स्थान निर्माण झालेलं असतं. धर्म व अंधश्रद्धा, आपल्यातील रुढ असलेल्या रिती, परंपरा, चालीरिती या बदलवता येत नाही. तरीही आज आपल्याला तशा स्वरुपाचं परीवर्तन झालेले दिसत आहे. धर्म बदललेला दिसतो. अंधश्रद्धाही काही प्रमाणात बदललेल्या दिसतात. त्यातच प्रथा, परंपरा, चालीरितीही बदललेल्या दिसतात. त्याचं कारण काय असावं? त्याची अनेक कारणं आहेत, पहिलं कारण आहे, बालपणात एखाद्यावर न झालेले संस्कार. तशीच सामाजिक भीती. सामाजिक भीती याचा अर्थ अशा प्रकारचा नवीन विचार स्विकारतांना समाजाची भीती न बाळगणे. तसं माणसाचं मन हे चंचल असतंच. अशा चंचल मनात भविष्यात आयुष्याची वाट चढत असतांना जर कोणी भीती दाखवली तर...जसं एखाद्या हिंदू धर्मातील व्यक्तीवर कधी एखादं संकट आल्यावर त्याला सांगीतलं जातं की हिंदू धर्मात ते संकट पेलण्याचं साहस नाही. जे साहस आमच्या धर्मात आहे. अर्थात हिंदू धर्मात मेलेल्या माणसांची भूतं छळत असतात. ती भूतं आमच्या धर्मात छळत नाहीत. आमच्या धर्मात साधं पुस्तकाचं वाचन केल्यास भूतं दूर पळून जातात. आमच्या धर्मात कॅन्सर नावाचा असाध्य रोग छळत नाही. याबाबतीत सांगायचं झाल्यास कॅन्सर नावाचा असाध्य रोग एखाद्या परिवारातील एखाद्या सदस्याला झाला असेल व त्यानं धर्म परीवर्तन केल्यावर तो आजार दूर झाला असेल तर बस. घेतलेला दुसरा धर्म त्याच्याच मनात नाही तर त्याच्यानंतर इतर येणाऱ्या पिढीसाठी दृढ बनून जातो.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर.

हे जरी खरं असलं तरी कॅन्सरसारखा असाध्य आजार तोही शरीरातील आजार कोणताच धर्म हा दूर करु शकत नाही. मग तशा स्वरुपाचा आजार धर्मपरीवर्तन करताच कसा दूर होतो. त्याचं कारण आहे, माणसाच्या मनात असलेली दृढ शक्ती. जी दृढ शक्ती धर्मपरीवर्तन करतांना इतर धर्मपरीवर्तन करणाऱ्या व्यक्तीनं भरलेली असते. त्याच आत्मविश्वासाच्या जोरावर धर्मपरीवर्तन करताच संबंधित व्यक्ती बरा झालेला असतो, जर कॅन्सर हा पहिल्या स्टेजमध्ये असेल तर...कधी कधी कोणत्याही स्वरुपाचे काही असाध्य रोग हे माणसाच्या मनातील दृढ शक्तींनी बरे होत असतात. पण हे कोणाला सांगावे? आधीपासूनच चंचल मन असणाऱ्या व्यक्तीला सांगून काही उपयोग होत नाही. कारण तशा स्वरुपाच्या व्यक्तीला असे विचार कितीही बदडून सांगीतले तरी ते त्याच्या मनाच्या अंतर्भागापर्यंत पोहोचतच नाहीत. शिवाय जर एखादा धर्म कॅन्सरसारखा आजार दुरुस्त करीत असेल, त्या धर्मात भूतांना रोखणारी ताकत असेल तर तो धर्म घेतल्यानंतर त्या धर्मातील लोकँ कधीच मरायला नकोत. ते कमीतकमी त्रिकालाबाधित अमरच व्हायला हवेत ना. हे जरी खरं असलं तरी लोकँ मरतातच. मग जे धर्म कॅन्सरसारखे असाध्य अहणारे आजार दुरुस्त करीत असतात. त्याच धर्मात आपलं मरण रोखण्याची ताकद नसावी काय?

धर्म परीवर्तनाचं दुसरं कारण आहे, माणसाच्या मनातील भीती. कधीकधी माणसाला धर्मपरीवर्तन करा, नाही तर आम्ही तुमची हत्या करु. अशा ट्कारचं वक्तव्य केलं जातं. जणू भीतीच दाखवली जाते. जसं बाबरपासून तर पुढे औरंगजेबापर्यंत सत्ता गाजविणाऱ्या सर्व सत्ताधिशांनी केलं. औरंगजेब तर धर्माच्या बाबतीत द्रष्टाच होता. असं धर्मपरीवर्तन करतांना औरंगजेबानं लोकांना भयंकर स्वरुपाची भीती दाखवली. ज्यातून सहजच लोकांनी धर्मपरीवर्तन केलं. हे जरी खरं असलं तरी संस्कार हे अगदी लहानपणापासूनच होत असतात. ते बदलवता येत नाही. या गोष्टीनुसार राजे संभाजी महाराजांनी त्याच्या बोलण्याची भीती न बाळगता आपल्यावर होणारा अनन्वीत त्रास सहन केला. परंतु धर्म बदलवला नाही. तेच घडलं गोव्यातील जनतेबाबत. त्या ठिकाणी असलेला आजचा हातकातरी खांब, धर्मपरीवर्तनाची साक्ष देतो. धर्म परीवर्तन करा, नाहीतर हात कातरतो. असे म्हणणाऱ्या पोर्तुगीजांना आम्ही धर्म बदल करणार नाही, जरी आमचे हात कापले गेले तरी. असे सहजच उत्तर देवून आपले हात कापून घेणाऱ्या धर्मद्रष्ट्या लोकांना आपण काय म्हणावे बरे. महत्वपुर्ण बाब ही की काल संभाजी महाराज किंवा गोव्यातील लोकांनाही त्यांचे धर्मपरीवर्तन करवून घेतांना अनेक आमीषे दाखवली गेलीत. त्यांना भीतीही दाखवली गेली नव्हे तर त्यांचे अनन्वीत हाल केले गेलेत. तरीही त्यांनी आपला धर्मपरीवर्तन केला नाही. आपल्या मनातील धर्म हा दृढच ठेवला. कारण होते संस्कार. जे संस्कार त्यांच्या बालपणापासून त्यांच्यावर रुजले होते. ज्या संस्कारातून त्याच्या हस्ते बुद्धभुषण ग्रंथ लिहिल्या गेला. अन् आजची मंडळी कॅन्सरसारखा असाध्य रोग बरा होतो म्हणून तर कधी कोणत्या शुल्लक कारणानं धर्म बदलवतात. म्हणतात की अमूक अमूक धर्मात राहून आम्ही सुखी नाही.

परीवर्तन ही काळाची गरज आहे. माणसानं येणाऱ्या विपरीत परिस्थितीनुसार स्वतःला बदलवायलाच हवं. जसे उन्हाळा जसजसा दिवसेंदिवस जर तप्त होत गेला, तसंतशा माणसांनी स्वतःच्या सुखासाठी सोयी आणल्या. आधी हातानं बनवलेले पंखे आणले. परंतु हात दुखत असत सतत फिरवावे लागत असल्यानं. त्यानंतर माणसानं पंखे आणले. त्यानंतर कुलर आणला व आता एसी आणला. पुढं आणखी काही येईल. तसंच प्रकाश मिळविण्यासाठी आणि अंधारावर मात करण्यासाठी आधी शेकोटी आणली. त्यानंतर कँदील आणला. वीज आणली आणि आता सौरपॅनल. असं बऱ्याच बाबतीत घडलं. कालचा ब्लॅक अँड व्हाईट टिव्ही जावून आता लोकँ एल सी डी पर्यंत पोहोचले. मोबाईलमध्येही क्रांती होवून आता स्मार्टफोन आला. तसंच धर्माच्या बाबतीतही घडलंच. लोकांनी पाषाणात देव नाही. हे ठरवून काहींनी मुर्तीपुजाही सोडली. त्यातच आपल्या विचारात परीवर्तन करुन कालचा डोक्यावरचा पदर नष्ट केला व त्याजागी जीन्स व टी शर्ट आणला. डोक्यावरची टिकली, गळ्यातील मंगळसूत्र गायब केलं. हे ठीक झालं. असे बदल व्हायलाच हवेत. जे झाले. अर्थातच चांगलं असेल ते घेतलेलंच बरं. परंतु धर्मपरीवर्तन शुल्लक कारणानं करणं बरोबर नाही. ज्यातून वाद निर्माण होत असतात.

महत्वाचं सांगायचं म्हणजे लोकँ धर्मपरीवर्तन करतात. करवून घेतात. हे बरोबर आहे आणि करावंच. परंतु असं धर्मपरीवर्तन करतांना लव्ह जेहाद वापरणं बरोबर नाही. अहं धर्मपरीवर्तन करतांना लोकांना भीती दाखवणं बरोबर नाही आणि असं धर्मपरीवर्तन करतांना लोकांना अमूक अमूक धर्मात अमूक अमूक गोष्टी चांगल्या नाहीत. असं म्हणून धर्म परीवर्तन करुन घेवू नये. ज्यातून वाद निर्माण होतात व वादाची परियंती एकमेकांच्या हत्येत होते. हं, एखाद्या धर्मातील तत्वे त्याच धर्मातील माणसाला छळत आहेत. ती तत्वे त्याच धर्मात एकाला मित्रासारखी व एकाला शत्रूंसारखी वागणूक जर देत आहे तर असे धर्म त्यावेळेस बदलविणे ही बाब तेवढी गंभीर नाही. जसं अस्पृश्यांचं धर्मपरीवर्तन करतांना डॉ. बाबासाहेबांनी पाऊल उचललं. ना रहेगा बॉस ना बजेगी बासरी अर्थात ना तुमचा धर्म ना तुमच्या धर्मातील भेदभाव. हे जर खरं असलं तरी सध्या जग बददललं आहे. आता धर्मपरीवर्तनाच्या बाबतीत कोणत्याच धर्मात भेदभाव नाही. कोणताच धर्म आता धर्मपरीवर्तनाच्या बाबतीत भीती दाखवत नाही. तेव्हा धर्मपरीवर्तन करतांना स्वतःला तशा स्वरुपाचं वर्णीत करु नये. हं, जर संबंधित धर्माची तत्वे चांगली जर वाटत असेल तर अभ्यास करुन तो धर्म स्विकारावा. स्वतःमध्ये त्या धर्माबाबत अंधश्रद्धा निर्माण करुन नाही. जसा अमूक अमूक धर्म कॅन्सर दुरुस्त करतो. कारण जगात असे कोणतेच धर्म नाहीत की जे असाध्य आजार दूर करु शकतील. तसेच लव्ह जिहादच्या नावावर तर अजिबात धर्म परीवर्तन करु नये. त्यावेळेस संभाजीचे बलिदान वा गोव्यातील हातकातरी खांब लक्षात घ्यावे. तसंच धर्म बदल केला तरी चालेल, परंतु धर्माच्या नावावर कोणीही समाजात सामाजिक तेढ निर्माण करुन एकमेकांची कत्तल करु नये. जेणेकरुन देशात राहणाऱ्या आपल्याच नातेवाईकांची कत्तल होईल व आपलाच कोणीतरी एखादा वंशज मारला जाईल. हेच रुढी, परंपरा, चालीरिती व अंधश्रद्धेच्या बाबतीतही घडावं म्हणजे झालं.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

## अधिक मासानिमित्त 'कथा पंढरीनाथाची' ज्ञानयज्ञ

नांदेड/प्रतिनिधी-अधिक मासानिमित्त येथील श्री सत्संग सेवा समितीच्या वतीने कथा पंढरीनाथाची (संपूर्ण पांडुरंग चरित्र) या आध्यात्मिक कथा सोहळ्याचे आयोजन ३० मे ते ३ जून या कालावधीत डॉ.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात करण्यात आले आहे. या कथामालेत गौडीय वैष्णवाचार्य श्री युगलशरणजी महाराज (अहिल्यानगर) यांचे प्रवचन होणार आहे. त्यांच्या ओजस्वी वाणीतून पांडुरंग चरित्र, भक्त पुंडलिकाचे जीवनकार्य, चंद्रभागेचे महात्म्य, एकादशीचे धार्मिक महत्व तसेच भक्त परंपरेवरील विविध प्रसंग उलगडले जाणार आहेत. हा कार्यक्रम दररोज दुपारी ३ ते सायं.७ दरम्यान होणार असून, कथेसोबत विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याच्या पहिल्या दिवशी शनिवारी (दि.३०) पंढरपूर महिमा कथा, रविवारी (दि.३१) पुंडलिक-पांडुरंग कथा, सोमवारी (दि.१) चंद्रभागा महिला कथा, मंगळवारी (दि.२) एकादशी महिला कथा, तर समारोपाच्या दिवशी बुधवारी (दि.३) मंगळवेढा भक्त चरित्र कथा सादर केली जाणार आहे.

# पोलीस कर्मचाऱ्याकडून महिला व कुटुंबियाला मारहाण

अर्धापूर/प्रतिनिधी-अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथे शेतातील बांधकामाच्या वादातून एका पोलीस कर्मचाऱ्यासह चौघांनी मिळून महिला आणि त्यांच्या कुटुंबियांवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी अर्धापूर पोलीस ठाण्यात गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधीत कर्मचाऱ्या विरुध्द कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

मालेगाव येथील गट क्रमांक १५७ मध्ये महिला आपल्या सासरच्या शेतात २० मे रोजी सायंकाळी हळदीचे बेड तयार करण्याचे काम करीत होती. यावेळी पोलीस कर्मचारी रेवन उर्फ अर्जुन सिद्धेश्वर स्वामी, रघुनाथ सिद्धेश्वर स्वामी, सिद्धेश्वर नागनाथ स्वामी आणि एक महिला यांनी ट्रॅक्टर अडवून काम बंद पाडले. पोलीस कर्मचारी व त्यांच्या साथीदारांनी महिलेस अश्लील शिवीगाळ करत आरोपी रेवन स्वामी याने फिर्यादीचा हात धरून ओढणी ओढली आणि जमिनीवर पाडून त्यांचा विनयभंग केला. रघुनाथ स्वामी याने फिर्यादी महिलेचा विनयभंग करुन मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या फिर्यादीच्या पतीला आरोपी रघुनाथने हातातील कड्याने तोंडावर व मानेवर मारहाण केली ज्यामुळे त्यांचा एक दात पडला असून ते गंभीर जखमी झाले आहेत. यासोबतच आरोपींनी फिर्यादीचे दीर आणि सासू यांनाही लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण केली. घटनेच्या वेळी आरोपी पोलीस कर्मचारी रेवन स्वामी याने स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करत मी पोलीस आहे माझे कोणी वाकडे करू शकत नाही तुला खोट्या केसमध्ये अडकवतो अशी उघड धमकी दिली. या घटनेनंतर फिर्यादी महिला २७ मे रोजी अर्धापूर पोलीस ठाण्यात पोहोचल्या आणि जबाब नोंदवला. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अर्धापूर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकाँ बालाजी चाटे हे करत आहेत. पोलीस खात्यातील जबाबदार व्यक्तीनेच अशा प्रकारे कायदा हातात घेतल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.






राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरुवारी नांदेड दौऱ्यावर आले असतांना त्यांनी आ.बालाजी कल्याणकर यांना वाढदिवसानिमित्त दोन दिवस अगोदरच शुभेच्छा दिल्या. यावेळी जलसंधारण मंत्री संजय राठोड, आ.हेमंत पाटील, आ.आनंदराव बोंढारकर, आ.मंगेश कुडाळकर, जिल्हाप्रमुख विनय गिरडे, मंगेश शिंदे, नारायण कदम, श्याम कोकाटे व इतर उपस्थित होते.

## उमरी येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य जन्मोत्सव सोहळा

उमरी/प्रतिनिधी-उमरी शहरात सोमवार, दि.१ जून रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने दिवसभर विविध सांस्कृतिक व ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा उद्योजक शिवश्री सर्जेराव गणेशराव पाटील ढगे राहणार आहेत.



जन्मोत्सवाची सुरुवात सकाळी ८ ते १० वाजेदरम्यान ध्वजारोहण सोहळ्याने होणार असून, त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना मानवंदना अर्पण करण्यात येणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्त आणि नागरिक उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. सायं.४ वा. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवबा राजा फेम गायक अवधूत गांधी आळंदीकर यांचा संगीतमय कार्यक्रम होणार आहे. शिवचरित्रावर आधारित गीतांनी हा कार्यक्रम रंगणार असून, शिवभक्तांसाठी तो विशेष आकर्षण ठरणार आहे. तसेच सायं.४ ते ६ वाजेदरम्यान भव्य विद्युत रोषणाई करण्यात येणार असून, उमरीच्या मोंढा परिसरात उत्सवी वातावरण निर्माण होणार आहे. शहराच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव साजरा केला जात असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. उमरी शहर व तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या सर्वसंमतीने शिवश्री सर्जेराव गणेशराव पाटील ढगे यांची उत्सव समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा जन्मोत्सव सोहळा भव्य आणि संस्मरणीय करण्यासाठी जय्यत तयारी सुरू असल्याचे आयोजकांनी सांगितले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा युवकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# ऐन उन्हाळ्यात जनगणनेचे ओझे;टीईटीच्या अभ्यासावर परिणाम

## परीक्षा पुढे ढकलण्याची शिक्षकांची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-राज्यात सुरू असलेल्या जनगणनेच्या कामामुळे शिक्षकांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असून, त्याचा थेट परिणाम शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) देणाऱ्या शिक्षकांच्या अभ्यासावर होत असल्याची भावना शिक्षकांमधून व्यक्त होत आहे. ऐन उन्हाळयात दिवसभर जनगणनेचे काम आणि त्यानंतर टीईटीची तयारी करणे कठीण होत असल्याने परीक्षा पुढे ढकलण्याची मागणीही आता जोर धरू लागली आहे.

शासनाने जनगणनेची जबाबदारी शिक्षकांवर सोपविल्याने अनेक शिक्षकांना सकाळपासून संध्याकाळपर्यंत गावोगावी फिरून माहिती संकलनाचे काम करावे लागत आहे. त्यामुळे टीईटी परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक असलेला वेळ मिळत नसल्याची खंत शिक्षकांनी व्यक्त केली आहे. दिवसभराच्या कामानंतर रात्री अभ्यास करण्याचा प्रयत्न होत असला तरी थकवा आणि मानसिक ताणामुळे अभ्यासावर परिणाम होत असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे.देगलूर तालुक्यात सध्या तापमानाचा पारा ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे गेला आहे. अशा कडक उन्हात ग्रामीण तसेच शहरी भागात घराघरांत जाऊन जनगणनेची माहिती गोळा करण्याचे काम करावे लागत असल्याने उष्माघात, थकवा आणि इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची भीती शिक्षकांनी व्यक्त केली आहे. यंदाच्या उन्हाळी सुट्ट्यांमध्येही जवळपास ८० टक्के शिक्षक जनगणनेच्या कामात व्यस्त असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे वैयक्तिक नियोजनासह टीईटी परीक्षेची तयारीही विस्कळीत झाली आहे. २८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेसाठी आता अवघा महिनाभराचा कालावधी शिल्लक राहिला असून, जनगणनेचे काम आणि अभ्यास यामध्ये समतोल साधणे कठीण झाले आहे.दरम्यान, टीईटी परीक्षेच्या अर्ज भरण्याची प्रक्रियाही सुरू असल्याने शिक्षकांना जनगणनेच्या कामासोबतच परीक्षा अर्ज भरण्याची धावपळ करावी लागत आहे. त्यामुळे शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन जनगणनेच्या कामासाठी पर्यायी व्यवस्था करावी किंवा टीईटी परीक्षेची तारीख किमान एक महिना पुढे ढकलण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी शिक्षकांकडून करण्यात येत आहे.शिक्षक संघटनांनीही या विषयाकडे लक्ष वेधत शिक्षकांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. जनगणना आणि शैक्षणिक जबाबदाऱ्या यांचा समतोल राखण्यासाठी शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा शिक्षकवर्गातून व्यक्त होत आहे.

## जांब बु.मंडळातील शेतकरी खरीप पीक विम्यापासून वंचित

मुखेड/प्रतिनिधी-जांब बु. महसूल मंडळातील शेतकऱ्यांना गेल्या खरीप हंगामातील पिक विमा मंजूर होऊनही शेतकरी अद्यापही पीक विमाच्या नुकसान भरपाई पासून वंचित असल्याने या भागातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

गेल्या वर्षीच्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसामुळे खरीपातील सोयाबीन, मुग, उडीद व कापूससह संपूर्ण पिके निसर्गाच्या अवकृपेमुळे हाता तोंडाला आलेली पूर्णपणे गेली असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात मोठी घट झाली असल्याने आर्थिक फटका बसला आहे. सततच्या निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकरी हतबल होतं आहे, त्यांतच जांब बु. महसूल मंडळातील शेतकऱ्यांच्या सोयाबीनला हेक्टरी सर्वात कमी पिक विमा मंजूर झाल्याचेही सोशल मिडिया वर व्हायरल झाले आहे, पिकविमा योजना ही पिकांच्या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी आधार म्हणून राबविण्यात येते. मात्र प्रत्यक्षात पूर्णत: शेतकऱ्यांचे नैसर्गिक नुकसान होऊनही शेतकऱ्यांना वेळेत नुकसान भरपाईची मदत मिळत नसल्याने शेतकरी अक्षरश; हतबल झाला आहे, तालुक्यातील अन्य महसूल मंडळातील शेतकऱ्यांना खरीपातील पिक विमा मिळाला आहे पण जांब बु. मंडळात हेक्टरी सर्वात कमी पिक विमा मंजूर होऊनही अद्याप येथील शेतकरी पिक विम्यापासून वंचित आहेत, या वर्षीचा खरीप हंगाम तोंडावर आला असताना शेतकरी रासायनिक खते, बियाणे व पेरणीच्या तयारीसाठी पराकष्ठा करीत आहे, पिक विमा कँम्पनी कडून हक्काचा विमा मिळेल अशी अपेक्षा या भागातील शेतकरी करीत आहेत.

## मुदखेडमध्ये डॉ.आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी साखळी उपोषण

मुदखेड/प्रतिनिधी-भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा उभारणीस परवानगी मिळावी या मागणीसाठी मुदखेड येथील सामाजिक कार्यकर्ते मारोती शिवाजी डुबुकवाड यांनी सुरू केलेले साखळी उपोषण १७ व्या दिवशीही सुरू असून, या आंदोलनाला आता विविध सामाजिक संघटनांचा पाठिंबा मिळू लागला आहे.

पुतळा उभारणीसाठी वारंवार अर्ज, निवेदने आणि पाठपुरावा करूनही नगरपरिषद प्रशासन तसेच राज्य शासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. यामुळे प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत असून, मागणी मान्य न झाल्यास न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, या आंदोलनाची दखल घेत बहुजन संघर्ष सेनाचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांनी उपोषण स्थळी भेट देत आंदोलनाला जाहीर आणि सक्रिय पाठिंबा दिला. यावेळी बोलताना सुखदेव चिखलीकर यांनी प्रशासनाला इशारा देत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला तात्काळ परवानगी देऊन उभारणीचा मार्ग मोकळा करावा. अन्यथा बहुजन संघर्ष सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. निर्माण होणाऱ्या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असे स्पष्ट केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा उभारणीच्या मागणीसाठी सुरू असलेल्या या आंदोलनाकडे शहरवासीयांसह सामाजिक संघटनांचे लक्ष लागले आहे.

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोचिंग क्लासेसवर कडक कारवाई करा-आ.राजेश पवार

नायगाव/प्रतिनिधी-नांदेड शहर व जिल्ह्यातील खासगी कोचिंग क्लासेसकडून शासनाच्या अटी व नियमांचे पालन न करता सातत्याने उल्लंघन करून विद्यार्थी व पालकांची आर्थिक लूट केली जात असल्याचा आरोप करत नियमभंग करणाऱ्या क्लासेस चालकांवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी आमदार राजेश पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.



सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, गाईड लाईन्स फॉर रेग्युलेशन ऑफ कोचिंग सेंटर अंतर्गत शिक्षण मंत्रालयाने घालून दिलेल्या नियमांचे अनेक खासगी कोचिंग क्लासेसकडून खुलेआम उल्लंघन केले जात आहे. शिक्षणाचे व्यापारीकरण करून विद्यार्थ्यांकडून अव्वाच्या सव्वा फी आकारली जात असून सर्वसामान्य व गोरगरिब पालकांची आर्थिक पिळवणूक होत आहे. तसेच गुणवत्तेपेक्षा जाहिरातबाजी व खोट्या दाव्यांना महत्त्व देत काही क्लासेस विद्यार्थ्यांची दिशाभूल करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. अशा क्लासेसवर तातडीने कठोर कारवाई करून शिक्षण क्षेत्रात शिस्त निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.यासोबतच कोचिंग क्लासेसच्या नियमनासाठी काही सुधारित सूचना देखील प्रशासनाकडे पत्रव्यवहाराद्वारे सादर करण्यात आल्या आहेत. नियमांचे काटेकोर पालन झाल्यास विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यास मदत होईल व शिक्षण क्षेत्रातील अनियमिततेला आळा बसेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**CHANGE IN NAME/SURNAME**

My (old name) is **BHISE RAVINDRA VENKATRAO** which now I am, changing as (new name) **RAVINDRA VYANKATI MISE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**RAVINDRA VYANKATI MISE**
R/o 180, Shivaji chock Loha
Tq.Loha Dist. Nanded-431708
M.No.-9527698874

**CHANGE IN NAME/SURNAME**

My (old name) is **BHISE VENKATRAO** which now I am, changing as (new name) **VYANKATI RAJENDRA MISE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**VYANKATI RAJENDRA MISE**
R/o 180, Shivaji chock Loha
Tq.Loha Dist. Nanded-431708
M.No.-9527698874

## न.प.च्या ट्रॅक्टर अपघातातील मृताच्या वारसदाराचे १ जूनपासून आमरण उपोषण

मुखेड/प्रतिनिधी-शासकीय दिरंगाई आणि भ्रष्ट व्यवस्थेचा बळी ठरलेली एक ७५ वर्षीय वृद्ध महिला आता आपल्या हक्काच्या न्यायासाठी थेट मृत्यूशी झुंज देण्यास तयार झाली आहे. मुखेड नगर परिषदेच्या कचरा ट्रॅक्टर अपघातात आपल्या नणंदेला गमावलेल्या श्रीमती नुराबी अ. करीम बल्खी यांनी तब्बल अडीच वर्षांच्या प्रतीक्षेनंतर, प्रशासनाच्या संवेदनाहीनतेचा निषेध करत १ जून पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'आमरण उपोषणा'चा इशारा दिला आहे.

गेल्या दोन-अडीच वर्षांपूर्वी मुखेड नगर परिषदेच्या कचरा संकलन करणाऱ्या एका भरधाव ट्रॅक्टरने राबियाबी अहमद बल्खी यांना चिरडले होते. या भीषण अपघातात त्यांचा मृत्यू झाला. मृत राबियाबी यांच्या वारसदार असलेल्या वर्षीय नुराबी बल्खी तेव्हापासून नुकसान भरपाईसाठी सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवत आहेत. ज्या ट्रॅक्टरने अपघात झाला, तो कचरा वाहतूक करणारा ट्रॅक्टर विना नंबर प्लेट, विना फिटनेस सर्टिफिकेट आणि विना विमा असल्याचे समजते. हा थेट मोटर वाहन कायद्याचा भंग असूनही संबंधित 'पल्लवी एंटरप्रायजेस' या कँन्राटदारावर कोणतीही फौजदारी कारवाई झालेली नाही. गेल्या १० महिन्यांपासून हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून, जिल्हाधिकारी कार्यालयाने मुखेड नगरपालिका आणि पोलीस प्रशासनाकडून अहवाल मागवूनही अद्याप तो सादर झालेला नाही. अधिकारी केवळ 'स्मरणपत्रे' पाठवून वेळ मारून नेत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अपघातानंतर स्थानिक पातळीवर नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, परंतु आजपर्यंत एका रुपयाचीही मदत मिळाली नसल्याचे पीडितेने नमूद केले आहे.प्रशासनाच्या या 'कागदी घोडे' नाचवण्याच्या कारभाराला कँटाळून, नुराबी बल्खी यांनी नुकसान भरपाईची मागणी करत १ जून पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसण्याचा निर्धार केला आहे. जर उपोषणादरम्यान आपल्या जीवितास काही धोका निर्माण झाला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालय, मुखेड नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाची राहील, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## अग्रवाल संघटनेची इंदोरला दोन दिवसीय राष्ट्रीय बैठक

नांदेड/प्रतिनिधी-अखिल भारतीय अग्रवाल संघटनेची दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक येत्या ३० व ३१ मे रोजी मध्य प्रदेश मधील इंदोर येथे संपन्न होणार आहे. येणाऱ्या काळात विविध समाजोपयोगी कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत सदर बैठकीत निर्णय घेण्यात येणार आहेत.

संघटनेला बळकट करण्यासाठी अग्रवाल समाजातील सर्वांना एकत्रितरित्या सामावून घेवून संघटित करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातही सर्व जिल्ह्यात अग्रवाल संघटनेचे जाळे विस्तारित करण्याच्या उद्देशाने ही बैठक महत्वपूर्ण असणार आहे. सदर बैठकीस राष्ट्रातील विविध राज्यांच्या राज्याचे प्रदेशाध्यक्ष, प्रदेश महामंत्री राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य पदाधिकारी, विविध आमंत्रित सदस्य उपस्थित राहून सखोल चर्चा करणार आहेत. सदर बैठकीस अग्रवाल संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अखिल भारतीय अग्रवाल संघटनेच्या प्रोफेशनल समितीचे राष्ट्रीय संयोजक डॉ.दीपक अग्रवाल यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

# फित कापली मान्यवरांनी, बळी गेला बालकाचा; इस्लामपूरातील स्विमिंगपूल वादाच्या भोवऱ्यात

किनवट/प्रतिनिधी- इस्लामपूरातील विनापरवाना चालू असलेल्या स्वीमींगपुलाच्या दुर्गंधीयुक्त पाण्यात बुडून तेरा वर्षीय ज्ञानेश्वर चंद्रे या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. नागनाथ चंद्रे सावरीकर यांच्या फिर्यादीवरून किनवट पोलीसांनी गुन्ह्याची नोंद करून काजी सय्यद मुसीबोद्दीनला अटक केली आहे. उल्लेखनीय म्हणजे उपनगराध्यक्ष हसनलाला, नगरसेवक साजिदखान यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते विनापरवाना स्विमींगपुलाचे अनधिकृत उद्घाटन केले होते. नगरपरिषदेला साक्षी ठेवून अवैधपणे चालू असलेल्या स्वीमींगपुलाने पहिला बळी घेतला असून याची जबाबदारी निश्चित करुन नगरपरिषद प्रशासनातील दोषींवर सुद्धा कारवाई करण्याच्या मागणीने जोर धरलाय.

२८ रोजी दुपारी ज्ञानेश्वर चंद्रे आणि गिरीधर माधव पंडागळे हे स्विमींगपुलातील पाण्यात पोहण्यासाठी गेले होते. त्यांना पोहता येत नव्हते याची कल्पना असो वा नसो मात्र प्रशिक्षीत ट्रेनरने दुर्लक्ष करायला नको. पाण्यात उतरण्यापूर्वी जीवरक्षक सोईसुविधा उपलब्ध असायला पाहिजेत त्या उपलब्ध नव्हत्या. पोहणे शिकणाऱ्या मुलांना प्रशीक्षीत ट्रेनरने लाईफ जॅकेट द्यायला पाहिजे ते दिलेले नव्हते. अशा अनेक गैरसोयीवर आक्षेप घेतलाय. ट्रेनरच्या मदतीने (एन.सी.आर.बी, एकीकृत अन्वेषण फॉर्म-१) आहे पोहणे न शिकवता व त्यांच्याकडे कुठलेही लक्ष न देता स्वीमींगपुलामधील पाण्यात उतरु दिल्यामुळे ज्ञानेश्वर गजानन चंद्रेंचा मृत्यू झाल्याचा आरोप केला आहे. फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या तत्परतेमुळे तात्काळ गुन्ह्याची नोंद आणि आरोपी काजी सय्यद मुसीबोद्दीनला अटक केलीय. पुढील तपासातून अवैध धंद्याची पोलखोल होणार आहे. गजानन चंद्रें हे किनवट तालुक्यातील सावरी येथील रहिवासी असून परिवहन महामंडळाच्या किनवट आगारात चालक म्हणून कार्यरत आहेत. किनवट नगरपरिषदेच्या अगदी काही अंतरावरच इस्लामपूरा भागात सभोवताल टीनपत्र्याचे कम्पाउन्ड उभा करून त्यात स्वीमींगपुल तयार केलाय. मुलांसाठी पन्नास आणि मोठ्यांसाठी सत्तर रुपये चार्जेस आकारले आहेत. मोठा गाजावाजा करून नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांचे चिरंजीव करण एंड्रलवार, उपनगराध्यक्ष हसनलाला, स्विकृत नगरसेवक साजिदखान निसारखान अशा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत थाटात फित कापून उद्घाटन करण्यात आले. किमान नगरपरिषदेच्या विद्यमान सत्ताधाऱ्यांनी तरी स्वीमींगपुलाच्या परवानगी विषयी खातरजमा करायला हवी होती. त्यांच्या साक्षीने जर अशी धंदे राजरोसपणे चालत असतील तर किनवटकरांची चिंता वाढविणारी बाब आहे. मुख्याधिकाऱ्यांनी तरी हस्तक्षेप करून अवैध स्वीमींगपुल चालकांवर फौजदारी कारवाई केली असती तर कदाचित ज्ञानेश्वर चंद्रे या बालकाचा प्राण वाचला असता अशा संतप्त प्रतिक्रिया ऐकायला मिळताहेत. याच पार्श्वभूमीवर आज नगरपरिषदेत जाऊन मुख्याधिकारी मुगाजी काकडेंची भेट घेण्याचा प्रयत्न केला मात्र नांदेडला असल्याचे दस्तुरखुद्द त्यांनीच कळवले. कार्यालयीन अधीक्षक भालेराव हे सुद्धा टेबलवर दिसून आले नाहीत. कामासाठी आलेल्या नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागले हे विशेष.

# कहाळा परिसरात गुटख्याची सर्रासपणे विक्री

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील कुंटूर पोलीस स्टेशन हद्दीत पुन्हा एकदा अवैध गुटखा विक्रीने डोके वर काढले असून, कहाळा परिसरात मोठ्या प्रमाणात गुटख्याची खुलेआम विक्री होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. मागील पंधरवड्यात आय.जी. कार्यालयाच्या विशेष पथकाने या परिसरात मोठ्या प्रमाणात धाडी टाकून कारवाई केली होती. त्यानंतर काही दिवस परिस्थिती नियंत्रणात असल्याचे दिसून आले.

मात्र पुन्हा एकदा कहाळा परिसरातून मोठ्या प्रमाणात गुटखा पुरवठा होत असल्याचे बोलले जात आहे. स्थानिकांच्या माहितीनुसार, कहाळा येथे गुटखा विक्रीचे मोठे सिंडिकेट कार्यरत असून, याच ठिकाणाहून जिल्ह्यातील विविध भागांत गुटखा पोहोचवला जात असल्याची चर्चा आहे. अवैध मार्गाने गुटखा विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर पोलीस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क विभाग, महसूल विभाग तसेच स्थानिक गुन्हे शाखा यांनी संयुक्तरीत्या धाडी टाकून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. गुटखा विक्रीमुळे युवकांमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढत असून, शासनाच्या बंदी आदेशालाही काही जणांकडून खुलेआम हरताळ फासला जात आहे. त्यामुळे संबंधित सर्व जबाबदार विभागांनी तात्काळ कारवाई करून या अवैध धंद्याला आळा घालावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# अधिक महिन्यात माहूर गडावर भाविकांची गर्दी; कारमधून अचानक धूर निघाल्याने उडाली तारांबळ

माहूर/प्रतिनिधी-अधिक महिन्याच्या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र माहूरगड येथे भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून, महाराष्ट्रासह इतर राज्यांतून हजारो भाविक रेणुकामातेच्या दर्शनासाठी दाखल होत आहेत. नागपूर वरून माहूर गडावर दर्शनाला आलेल्या भाविकाच्या कार मधून मोठ्या प्रमाणात धूर निघत असल्याचे पाहून गाडीतील चालक,प्रवाशी यांच्यासह भाविकात एकच तारांबळ उडाली.

मंदिर परिसरात पहाटेपासूनच दर्शनासाठी भक्तांच्या लांबलचक रांगा लागलेल्या दिसत आहेत. दि.२८ रोजी कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर नागपूरहून आलेल्या भाविकांच्या कारमध्ये अचानक बिघाड होऊन वाहनातून पांढरा धूर निघाल्याची घटना घडली. सलग सुमारे २०० किलोमीटरचा प्रवास करून भाविक माहूरगडावर पोहोचले होते. घाटाचा रस्ता पार करून वाहन मंदिर परिसराकडे जात असतानाच कारमधून अचानक धूर निघण्यास सुरुवात झाली. काही क्षणांतच संपूर्ण वाहन धुराने व्यापल्याने वाहनातील भाविकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच परिसरातील स्थानिक व्यापारी आणि नागरिकांनी तत्काळ धाव घेत वाहनातील सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले. घाबरलेल्या अवस्थेत चालकाला वाहन बंद करता येत नव्हते. यावेळी स्थानिक व्यापारी संजय घोगरे यांच्यासह इतर व्यापारी व काही चालकांनी पुढाकार घेत मदतकार्य सुरू केले. स्थानिकांनी चालकाला धीर देत वाहन सुरक्षितरीत्या बंद करण्याचा प्रयत्न केला आणि काही वेळानंतर वाहन बंद करण्यात यश आले. यानंतर माहूर येथील मेकॅनिक इरफान भाई यांना घटनास्थळी बोलावण्यात आले. त्यांनी वाहनाची पाहणी करून पुढील दुरुस्तीसाठी कार माहूर शहरातील गॅरेजमध्ये हलवली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, अचानक वाहनातून धूर निघाल्यामुळे काही काळ परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते.



भाजपा नांदेड उत्तर जिल्ह्याचे पं.दिनदयाल उपाध्याय दोन दिवशीय प्रशिक्षण अनंता लॉस येथे संपन्न झाले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना खा.डॉ.अजित गोपछडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड, मराठवाडा संघटक सुनील राणे, आ.भीमराव केराम, आ.श्रीजया चव्हाण, आ.संजय केनेकर, संजय कौडगे, चैतन्यबापू देशमुख, किरण पाटील, बाळासाहेब पांडे, किशोर देशमुख, किशोर स्वामी, गोविंदराव नागेलीकर, मंगाराणी अंबुलगेकर, संध्याताई राठोड यांच्यासह इतर उपस्थित होते.

# मतदार मॅपिंगसाठी पुढाकार घ्या; ३० मे पूर्वी प्रक्रिया पूर्ण करा-श्रावण पाटील भिलवंडे

नायगाव/प्रतिनिधी- नायगाव विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक पात्र मतदाराने आपले मतदार मॅपिंग ३० मे २०२६ पूर्वी तात्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे. मतदार मॅपिंगची अंतिम मुदत ३० मे असल्याने नागरिकांनी कोणतीही दिरंगाई न करता प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सुरू असलेली ही प्रक्रिया मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे. भविष्यात मतदानाच्या दिवशी कोणालाही अडचणी येऊ नयेत तसेच एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी मॅपिंग आवश्यक असल्याचे श्रावण पाटील भिलवंडे यांनी सांगितले. सध्या नायगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये मतदार मॅपिंगचे काम मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. काही ठिकाणी प्रक्रियेबाबत अपुरी माहिती, मोबाईल क्रमांक लिंक नसणे, ओटीपी



पडताळणीतील अडचणी तसेच तांत्रिक कारणांमुळे प्रक्रिया रखडत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी वेळ न लावता आपल्या मोबाईलद्वारे किंवा संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मतदार मॅपिंग करताना मोबाईल क्रमांक लिंक करणे, ओटीपी पडताळणी, कुटुंबातील सदस्यांची माहिती अद्ययावत करणे, पत्ता व वैयक्तिक तपशील तपासणे या प्रक्रिया पूर्ण कराव्या लागत आहेत. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना या प्रक्रियेची माहिती नसल्यामुळे बीएलओ यांनी नागरिकांना योग्य मार्गदर्शन करून सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले. मतदार याद्या अचूक राहण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराची नोंद व्यवस्थित असणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत पद्धतीनेच मॅपिंग पूर्ण करावे. ३० मे २०२६ ही शेवटची तारीख असल्याने सर्वांनी तातडीने प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन भिलवंडे यांनी केले. लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदार महत्त्वाचा असून एकही नागरिक मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी सर्वांनी जागरूक राहून स्वतःचे तसेच कुटुंबातील सदस्यांचे मतदार मॅपिंग त्वरीत पूर्ण करावे, असे आवाहन भाजपचे नेते श्रावण पाटील भिलवंडे यांनी केले आहे.

# रविंद्रसिंघ मोदी यांचे ३० मे रोजी नाशिक येथे व्याख्यान

नांदेड/प्रतिनिधी-शतकोत्तर परंपरा असलेल्या नाशिकच्या वसंत व्याख्यानमालेचा ज्ञानयज्ञ १ मे पासून सुरू झाला असून ३१ मे रोजी समारोप होणार आहे. दरम्यान उद्या ३० मे रोजी नांदेड येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते स.रविंद्रसिंघ मोदी यांचे हिंद की चादर श्री गुरु तेग बहादुर साहेबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त व्याख्यान होणार आहे.



सकस, सक्षम आणि तेवढेच सुदृढ विचार पेरण्याच्या या परंपरेचे यंदाचे १०३ वे वर्ष असून, या ज्ञानयज्ञात डॉ. अभय बंग, डॉ. मारुती पवार, प्रा. समीर मीत्रगोत्री, सौ. सरिता कौशिक, डॉ. गजानन घोडके, डॉ. नितीन वाघमोडे, भूषण गरवारे, विजय तळले या दिग्गज वक्त्यांची विविध विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्याने यंदाचे विशेष आकर्षण राहिले आहे. वसंत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी, कार्याध्यक्ष संगीता बाफणा, सरचिटणीस हेमंत देवरे, खजिनदार अविनाश वाळुंजे व पदाधिकारी, कार्यकारी मंडळातर्फे ही माहिती देण्यात आली. शनिवार (दि.३०) रोजी स.रविंद्रसिंघ मोदी यांचे हिंद की चादर श्री गुरु तेग बहादुर साहेबजी ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त व्याख्यान होणार आहे. यावेळी नांदेड येथील ज्येष्ठ पत्रकार तथा नानक साई फाऊंडेशनचे प्रमुख पंढरीनाथ बोकारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या व्याख्यानमालेचा रविवार दि. ३१ रोजी उत्सव नात्यांचा झी मराठी प्रस्तुत ग्रँड फिनाले कार्यक्रमाने समारोप होणार आहे.

पान १ वरुन

## राज्यात यंदा कमी...

अधिक जाणवू शकतो. एल निनोची वर्षे ही सामान्यतः अधिक उष्ण मानली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हवामान तज्ज्ञ मयुरेश प्रभुणे यांनीही यंदाच्या मान्सूनबाबत सावधगिरीचा इशारा दिला आहे. त्यांच्या मते, हवामान खात्याने ९० टक्के पावसाचा अंदाज व्यक्त केला असला तरी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता सुमारे ६० टक्के आहे. हवामान विभागाच्या निकषांनुसार ९० टक्के पर्जन्यमान हे देखील कमीच मानले जाते. त्यामुळे महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण सरासरीच्या खाली राहण्याची दाट शक्यता आहे. पहिल्या टप्प्यात एल निनोचा प्रभाव मर्यादित असला तरी जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये त्याची तीव्रता वाढणार असल्याने शेतकरी, प्रशासन आणि नागरिकांनी पाणी व्यवस्थापन व नियोजनाबाबत आतापासूनच सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

# कुंडलवाडीत बकरी ईद उत्साहात व शांततेत साजरी

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी शहरात ईदुल अजहा (बकरी ईद) हा पवित्र सण उत्साहपूर्ण व शांततापूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त ईदगाह मैदानावर मुस्लिम समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सामूहिक नमाज अदा केली.

मुनवर मस्जिदचे इमाम हाफिज वसीम रजवी यांच्या मार्गदर्शनाखाली ईदची नमाज पार पडली. यावेळी त्यांनी बकरी ईदच्या कुर्बानीचे धार्मिक महत्त्व विशद करताना इस्लाम धर्मातील विवाह समारंभांमध्ये होणारा अनाठायी खर्च टाळण्याचे आवाहन केले. तसेच ईदच्या नमाजची पद्धत आणि तिचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगितले. ईदचा खुदबा व विशेष दुआ जामा मस्जिदचे इमाम अलीम खुटुस यांनी केली. नमाजानंतर उपस्थितांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत बंधुभाव आणि ऐक्याचा संदेश दिला. ईदगाह परिसरात भाविकांच्या सोयीसाठी कुंडलवाडी नगरपालिकेच्या अध्यक्षा सौ. प्रेरणाताई कोटलावार, पालिका प्रशासन आणि ईदगाह कमिटीच्या वतीने आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी मनोहर मस्जिदचे अध्यक्ष मोहम्मद नजीर, हाफिज वसीम रजवी, गुलजार मस्जिदचे इमाम हाफिज यासीन, ईदगाह कमिटीचे अध्यक्ष सैयद मन्सूर अली, उपाध्यक्ष मोहम्मद अफजल, सदस्य शेख वहाब, रियाज शेख, अलीम शेख, फसिउद्दीन, जलाल खान पठाण, सैयद इस्ताक अली, अब्दुल मजीद नांदेडकर यांच्यासह मुस्लिम समाजातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## जरांगेंच्या भेटीसाठी...

झाले असून विभागीय आयुक्त कार्यालयात अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध तक्रारींचा आढावा घेत आहेत. बैठकीनंतर ते प्रसाद लाड यांच्यासह आंतरवाली सराटीकडे रवाना होणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी चर्चेला शिष्टमंडळ येऊ द्या, मात्र मी उपोषणावर ठाम आहे, अशी भूमिका जाहीर केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना विखे पाटील म्हणाले, उपोषण करणे हा त्यांचा अधिकार आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा होईल. चर्चेनंतर त्यांचे समाधान होईल, असा मला विश्वास आहे. मराठा समाजातील काही नागरिकांनी वैधता प्रमाणपत्र (व्हॅलिडीटी) असतानाही जात प्रमाणपत्रे व अन्य दाखले न मिळाल्याबाबत तक्रारी केल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. या तक्रारींची सखोल छाननी करून संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, प्रसाद लाड यांनीही जरांगे पाटील यांना उपोषणाचा निर्णय पुनर्विचार करण्याचे आवाहन केले.

## पुण्यात विषारी दारुने...

सवाल उपस्थित करत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. पोलिसांकडून या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराला वाचविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. विषारी दारू प्रकरणातील मृतांचा आकडा आणि प्रशासनाच्या भूमिकेवरून राज्यातील राजकारण तापण्याची चिन्हे दिसत असून, या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी जोर धरत आहे.

## नांदेड आणि नाशिक वगळता...

यवतमाळ, भंडारा, अमरावती, अहिल्यानगर, सोलापूर, धाराशिव-बीड-लातूर आणि नागपूर या आठ जागांवर उमेदवार उभे करणार आहे. ठाकरे गटाची शिवसेना रत्नागिरी, जळगाव, परभणी-हिंगोली आणि संभाजीनगर या चार जागांवर लढणार आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पुणे, ठाणे आणि सातारा-सांगली या तीन जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे सपकाळ यांनी सांगितले.

# ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.ज्योती देशमुख यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी- शहरातील ज्येष्ठ आणि सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. ज्योती देशमुख यांचे नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. त्या ८३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.



डॉ.ज्योती देशमुख यांनी आयुष्यभर वैद्यकीय सेवेसोबतच शिक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठीही उल्लेखनीय कार्य केले. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी नांदेड येथे महिला महाविद्यालय सुरू करण्यात पुढाकार घेतला, तसेच अर्धापूर येथे मीनाक्षी देशमुख मुलींचे हायस्कूल स्थापन करण्यातही त्यांचे मोलाचे योगदान होते. पती डॉ. डी. आर. देशमुख यांच्या समवेत त्यांनी १९६७ पासून नांदेडच्या सामान्य रुग्णालयात वैद्यकीय सेवा बजावली. डॉ. ज्योती देशमुख या शिवसेनेचे नांदेडचे माजी आमदार डॉ. डी. आर. देशमुख यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती डॉ. डी. आर. देशमुख, पुत्र डॉ. सचिन देशमुख, सून डॉ. क्षमा देशमुख (सध्या ऑस्ट्रेलिया), डॉ. नचिकेत देशमुख, सून डॉ. निकिता देशमुख, दोन नातू आणि एक नात असा परिवार आहे.

पान १ वरुन

## इंधन दरवाढी...

शंकर शिंदे, पाशा शेख, प्रबुद्ध चित्ते, दीपकसिंघ हुजुरिया, संजय वाघमारे, सुरज शिंदे, बापूसाहेब पाटील, अंबादास रातोळे, गगन यादव, ललिता कुंभार, गणेश कोकाटे, धनंजय उमरीकर, गणेश ढगे, अझहर शेख, निरंजन पावडे, नसीम पठाण, नईम, कलीम शेख, ॲड. शितल यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, महिला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधान परिषदेसाठी सत्ताधारी महायुती...

रत्नागिरी-सिंधुदुर्ग या जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. उर्वरित बहुतेक जागांवर भाजप निवडणूक लढवणार असल्याचे चित्र आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघावर भाजप आणि शिवसेना दोन्ही पक्षांनी दावा ठोकल्याने या जागेवर अद्यापही तिढा कायम आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४